# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

परिपत्रक क्र. आस्था/आरओ/६०/२०२०

अत्यंत महत्वाचे/तातडीचे

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1, दि. ३१ मे, २०२० मधील अ. क्र. ६ च्या iv नुसार महानगरपालिका क्षेत्रातील प्रतिबंधित क्षेत्राव्यतिरिक्त शासकीय कार्यालयांबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार सर्व शासकीय कार्यालये किमान १५ टक्के अथवा १५ कर्मचारी जे जास्त असेल तेवढया संख्येने सुरु करण्यात यावी असे आदेश देण्यात आले आहेत.

मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पत्र क्र. न्यायीक २०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य-५, दि. ३० मे, २०२० अन्वये कोवीड-१९ साथ उद्रेक कालावधीमध्ये कार्यालयांबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.४/व्यय-९, दि. २९ मे, २०२० अन्वये कोव्हिड-१९ संबंधित कर्तव्य बजावताना कोव्हिडमुळे मृत्यू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना विमा कवच/सानुग्रह सहाय्य लागू करण्यात आले आहे.

मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, औरंगाबाद यांनी कारोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे निर्गमित केलेले दि. ३१-०५-२०२० रोजीचे मनाई आदेश.

हे सर्व शासन आदेश, मार्गदर्शक सुचना, शासन निर्णय आणि मनाई आदेश वाचून सर्वांनी त्याची नोंद घ्यावी.

उपरोक्त शासन आदेशानुसार सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, दि. ०३-०६-२०२० पासून विद्यापीठातील प्रशासकीय कामकाज १५ टक्के अथवा १५ कर्मचारी जे जास्त असेल तेवढया कर्मचारी संख्येसह सुरु करण्यात येत आहे. यासाठी विद्यापीठात असलेला प्रत्येक प्रशासकीय/ शैक्षणिक विभाग हा एक युनिट मानण्यात येईल. त्यामुळे संबंधित विभागप्रमुखाने कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य आहे. सबब, सर्व संबंधित विभागप्रमुखांनी त्यांच्या अधिनस्थ कर्मचाऱ्यांना कामावर बोलाविण्याबाबत कार्यवाही करावी. जे शिक्षक, अधिकारी, कर्मचारी कन्टेनमेंट (प्रतिबंधित) क्षेत्रात आहेत त्यांनी तसे कळवावे, अशा कर्मचाऱ्यांना या उपस्थितीमधून वगळण्यात येत आहे. तथापि, प्रतिबंध उठविण्यात येताच त्यांनी कर्तव्यावर रुजू होण्याबाबत अवगत करावे.

विभागप्रमुखांनी, आपल्या विभागाचे आवश्यकतेनुसार निर्जंतुकीकरण करणेबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाच्या समन्वयाने करुन घ्यावी.

विद्यापीठातील सर्व शैक्षणिक कामकाज शासनाच्या पुढील आदेशापर्यंत बंद राहील.

कर्मचाऱ्यांनी मुख्यालय सोडू नये. जे कर्मचारी मुख्यालयाबाहेर आहेत त्यांनी मुख्यालयाच्या ठिकाणी उपस्थित रहावे. उर्वरित कर्मचाऱ्यांना वरिष्ठांनी फोन, एसएमएसव्दारे तातडीच्या कामांसाठी बोलावल्यास कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

सर्व शैक्षणिक/प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या अधिनस्थ कर्मचाऱ्यांच्या सदर परिपत्रक निदर्शणास आणून द्यावे तसेच सर्व संबंधीतांनी या परिपत्रकाची नोंद घेऊन काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

विद्यापीठ प्रांगण, )(
औरंगाबाद- ४३१ ००४ )(
दि. ०१-०६-२०२० )(

RSuryawanshi 2.6.2020
कुलसचिव

**या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढिल कार्यवाहीस्तव :-**

१. मा. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, उस्मानाबाद यांनी शासन आदेशानुसार त्यांच्या स्तरावरुन कार्यवाही करावी.
२. सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
४. प्राचार्य, मॉडेल कॉलेज, घनसांवगी, ता. घनसांवगी, जि. जालना यांनी शासन आदेशानुसार त्यांच्या स्तरावरुन कार्यवाही करावी.
५. प्राचार्य, सामाजिक कार्य महाविद्यालय, विद्यापीठ परिसर.
६. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी शासन आदेशानुसार त्यांच्या स्तरावरुन कार्यवाही करावी.
७. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सर्व शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना (SMS) एसएमएस करण्यात यावे.
८. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना व्यापक प्रसिध्दीस्तव.

**या परिपत्रकाची प्रत माहितीस्तव सविनय व समादाराने अग्रेषित :-**

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय - विस्तारीत इमारत, मुंबई-३२
२. मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१
३. सहसंचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे-१
४. सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
५. सहसंचालक (तंत्र शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद